www.arthritis-india.com

# वेदनाशामक औषधे

डॉ. श्रीकान्त वाघ, ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट, पुणे

वेदनाशामक अशी दोन-तीन प्रकारची औषधे डॉक्टरमंडळी वापरत असतात. ॲस्पिरीन आणि पॅरासेटामॉल ही त्यातली साधी वेदनाशामक औषधे आहेत. जगात सध्या दरवर्षी चाळीस हजार मेट्रिक टन इतके ॲस्पिरीन वापरले जाते. पॅरासेटामॉल हे औषध जगभर प्रिस्क्रिप्शनशिवाय मिळू शकते. ही औषधे मज्जातंतूमध्ये रासायनिक बदल घडवून वेदनाशमन करतात. ॲस्पिरीनमुळे जठरात पित्त वाढते आणि जळजळणे, मळमळणे अशी आम्लपित्ताची लक्षणे होतात. पॅरासेटामॉलने तितकेसे आम्लपित्त होत नाही. दिवसाला दोन ग्रॅमपेक्षा जास्त डोसने मात्र यकृतावर परिणाम होऊ शकतो. अर्थात कोणत्याही औषधाचा त्रास प्रत्येकाला एकसारखाच होईल असे नाही आणि एकूणच अशा उपद्रवांचे प्रमाण कमी असते. अन्यथा सरकार अशी औषधे बाजारात येऊ देत नाही.

साध्या वेदनाशामक औषधांचा दुसरा प्रकार म्हणजे अफूसारखी औषधे. आपल्या शरीरात अफूसारखी एन्डॉरिफिन्स ही तत्त्वे असतात. त्यांच्यासाठी मेंदूत ग्राहककेंद्रेही असतात. तशीच अफूपासून बनवलेली किंवा त्यासारखी औषधे मिळतात. ट्रॅमॅडॉल हे औषध पॅरासेटामॉलसोबत वापरले तर जास्त वेदनाशामक परिणाम साधतो. कोडीन हे खोकल्याचे औषध याच गटातले. ते खरे तर फार स्वस्त आहे. पण त्या गोळ्या बाजारात मिळत नाहीत. बहुधा कंपन्यांना त्यातून काही नफा मिळत नसावा. या औषधांनी चक्कर येणे, मळमळणे आणि झोप जास्त येणे असे उपद्रव काही जणांना होतात. व्यसन लागण्याचीही शक्यता असते. त्यामुळे ही औषधे दीर्घकाळ वापरू नयेत.

ऑपरेशन, मार लागणे, संधिवात यामधली वेदना सुजेमुळे असते. सूज कमी करून वेदना घालवणारी औषधे अशा वेळी डॉक्टर वापरतात. यात आयबुप्रोफेन, पिरॉक्सिकाम, नॅप्रोक्सेन, डायक्लोफेनॅक इत्यादि महत्त्वाची औषधे आहेत. त्या त्या नेमक्या परिस्थितीत योग्य ते औषध योग्य त्या मात्रेत आणि योग्य त्या कालावधीसाठी वापरणे हे डॉक्टरांचे कौशल्य आहे. एकट्या अमेरिकेत सूज कमी करणाऱ्या औषधांची दरमहा साठ लाख प्रिस्क्रिप्शन्स लिहिली जातात. सूज कमी करण्यासाठीच्या वेदनाशामकांचे महत्त्वाचे उपद्रव म्हणजे आम्लपित्त, त्वचेवरचे पुरळ, यकृत आणि मूत्रपिंडावरचे परिणाम हे होत. त्यामुळे ब्लडप्रेशरही वाढू शकते. अर्थात औषधाचे दुष्परिणाम हे रस्त्याने जाताना होणाऱ्या अपघातासारखे असतात. अपघात होईल म्हणून कोणी रस्त्याने जाण्याचे टाळत नाही. तसेच वेदना फार झाली तर ही औषधेही टाळता येत नाहीत. एक लाख रोग्यांनी वर्षभर वेदनाशामक घेतले तर जास्तीत जास्त आठ जणांना यकृतावर दुष्परिणाम झालेले आढळतात. सामान्यत: असे दुष्परिणाम रक्ताच्या चाचणीत सहज समजतात आणि औषध बंद केले की शरीर पुन्हा पूर्वपदावर येते.

याच गटात आम्लपित्ताचा त्रास न होणारे सेलेकॉक्सिब हे औषध १९९९ साली बाजारात आले. त्यासोबत वेगळे पित्तशामक घ्यावे लागत नाही. याच गटातल्या औषधांमुळे हार्टॲटॅक आणि अर्धांगवायू अशा रक्तवाहिन्यांच्या विकारांचा धोका तिपटीने वाढल्याचे लक्षात आल्यामुळे पुढे त्यातली दोन बाजारातून काढून घेण्यात आली. दोन अजूनही मिळतात. ती प्रभावी असली तरी हृदयविकाराचा धोका असलेल्या विशेषत: वयस्कर रुग्णांनी वापरू नयेत. संधिवातासारख्या जीर्ण आजारांमध्ये एकूणच वेदनाशामक औषधांचा वापर काळजीपूर्वक केला पाहिजे. सूज नसेल तेव्हा साधी वेदनाशामक औषधे वापरावीत. सूज कमी करणारी औषधेही जरूरीनुसारच आणि योग्य मात्रेत वापरावीत. तसेच त्यांच्या दुष्परिणामांविषयी सतर्क राहिले पाहिजे.

सूज कमी करण्यासाठी विशेषत: आमवातात स्टिरॉइड्स ही अत्यंत प्रभावी औषधे आहेत. सांध्यांमध्ये त्याचे इंजेक्शनही देता येते. आमवातात त्यांची मात्रा फारशी लागत नाही. स्टिरॉइड्सविषयी अनेकांच्या मनात भीती

असते. स्टिरॉइड्सनी आतापर्यंत लक्षावधी लोकांचे प्राण वाचले आहेत. आम्लपित्त, निद्रानाश, ब्लडप्रेशर, चेहरा सुजणे, चरबी वाढणे, हाडांचा विरळपणा, मोतिबिंदू असे अनेक उपद्रव दीर्घकाळ स्टिरॉइड्स घेतल्याने निर्माण होतात. मधुमेहाच्या रोग्यांमध्ये ती वापरता येत नाहीत.

तरीही वेदनाशामक औषधांपेक्षा स्टिरॉइड्स नक्कीच कमी धोकादायक आहेत. शिवाय आमवातातली सूज स्टिरॉइड्समुळे हमखास कमी होते. आमवातातल्या सुजेमुळे कूर्चा आणि हाडांना कधीही भरून न येणारे खड्डे पडतात आणि सांध्यांचा कायमचा नाश होतो. त्यामुळे आजाराचे गांभीर्य ओळखून दुष्परिणामांची पर्वा न करता स्टिरॉइड्स आणि अन्य वेदनाशामक औषधे वापरलीच पाहिजेत. फक्त ती तज्ज्ञांचे सल्ल्याने योग्य मात्रेत, योग्य कालावधीसाठी घेतली पाहिजेत. आपल्या मनाने दुकानातून औषध आणून घेणारे बरेच लोक असतात. आपल्या देशात दुकानदारही प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधे विकत असतात. हा प्रकार जास्त धोकादायक आहे.

वेदनानिवारणासाठी स्नायू सैल करणारी, मन शांत करणारी तसेच नैराश्य कमी करणारी औषधेही वापरता येतात.

सौजन्य - आरोग्यदर्पण, दिवाळी २००८